

श्री.जयदिप डाकरे सर श्री.प्रविण डाकरे सर

# माझा अभ्यास
Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe इयत्ता – चौथी (21 जुलै) माझा अभ्यास Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस एकवीस :






टेस्ट सोडवा

## वाचा व समजून घ्या.

### ५. मला शिकायचंय !

खानदेशातील एक गाव. त्या गावामध्ये सखाराम व त्याचं कुटुंब राहत होतं. सखाराम व त्याची पत्नी सुलभा हे दोघं दिवसभर उन्हातान्हात मजुरी करायचे. त्यांना स्नेहा नावाची एक मुलगी होती. तिचं चौथीपर्यंतचं शिक्षण झालं होतं. ती अत्यंत अभ्यासू व कष्टाळू होती. तिचा छोटा भाऊ पिंटू पहिलीत जाणार होता. गावात चौथीच्या पुढचे वर्ग नव्हते. 'वडील आपल्याला शिक्षणासाठी परगावी पाठवतील का,' असं सारखं स्नेहाला वाटायचं. बबली नावाची तिची मैत्रीण शिक्षणासाठी शेजारच्या गावी जाणार होती. स्नेहालाही तिच्यासारखं आपण पुढे शिकावं असं वाटायचं. तिच्या मनात शिक्षणाचाच विचार सारखा घोळत होता.

एके दिवशी नेहमीसारखं काम संपवून सखाराम व सुलभा घरी आले. मुलांना घरी ठेवून ते दोघं शेतावर गेले होते. पिंटू ओट्यावर खेळत असलेला सुलभाला दिसला, पण स्नेहा कुठे दिसत नव्हती. सुलभानं लगेचच 'स्नेहा, स्नेहा' म्हणून हाका मारल्या. आईची हाक ऐकताच स्नेहाच्या रडण्याचा आवाज वाढला. एका कोपऱ्यात बसून स्नेहा रडत असलेली सुलभाला दिसली. सुलभा तिच्या जवळ गेली. रडून रडून स्नेहाचे डोळे सुजले होते. सुलभा चिंतेत पडली. 'काय झालं' म्हणून तिला विचारू लागली. तेव्हा रडवेल्या आवाजात स्नेहा बोलू लागली.



''वर्गामधल्या बबलीनं पाचवीमा नाव टाकाई गयं... मन्हंबी नाव टाका पाचवीमा. ओ माय, माले पुढे शिकानं शे... माले शिकू द्यानं.'' तेवढ्यात हातपाय धुऊन सखाराम तिथे आला.

''स्नेहा, तुले चवथीलोंग शिकाडं... आते आनखीन पुढे शिकीसन काय करशीन तू ? आपली परिस्थिती आशी गरीबीनी.... परगावले कसा धाडू तुले... एसटीमा ये-जा करनी पडीन... तनंपेक्षा आते शाय बंद... घर बशीसन धाकला भाऊले संभाय. समजनं का तुले ?'' सखाराम थोड्या रागातच म्हणाला.

खालील संख्या सूचनेनुसार लिहा.

## २. संख्याज्ञान

टेस्ट सोडवा

२. विस्तारित रूपावरून संख्या लिहा.

(१) ३,००० + २०० + ५० +७ = ३२५७  (२) १०,००० + ५,००० + १ = ☐

(३) ४००० + ५०० + १० + ३ = ☐  (४) २०,००० + ३०० + ४० + ५ = ☐

(५) ७,००० + ८० + ३ = ☐  (६) ९०,००० + ९० + २ = ☐

३. अंक व त्यांची स्थाने दिलेली आहेत. त्यावरून संख्या तयार करा व लिहा.

जसे, ५ दह, २ ह, ३ श, २ द, १ ए = ५२,३२१ ; ९ श, ८ दह, ५ ए = ८०९०५

(१) ७ ए, २ द, ५ दह, ९ ह  (२) ३ श, ४ ह, ५ द, १ दह

(३) ५ द, ८ ह, ७ दह  (४) ५ ह, ७ दह, ३ श, २ द, ४ ए

### स्थानिक किंमत

ताई : आज आपण खेळ खेळूया. मी एक संख्या सांगेन. त्या संख्येचे विस्तारित रूप तुम्ही सांगायचे. संख्या : ५५,५५५

ध्रुव : ५०,००० + ५,००० + ५०० + ५० + ५

प्रियांका : संख्येत सर्व स्थानांत ५ हाच अंक आहे, पण प्रत्येकाची किंमत मात्र वेगवेगळी आहे !

ताई : अंकाची जागा किंवा स्थान त्या अंकाची स्थानिक किंमत ठरवते.
३७८४२ या संख्येतील प्रत्येक अंकाची स्थानिक किंमत सांगा.

ध्रुव : मी सांगतो. ३ दह म्हणजे ३ दशहजार म्हणजे ३०,०००, ७ ह म्हणजे ७०००, ८ श म्हणजे ८००, ४ द म्हणजे ४०, २ ए म्हणजे २.


### स्वाध्याय

खालील संख्यांमधील अधोरेखित अंकांची स्थानिक किंमत लिहा.

(१) १,९९९  (२) २,३४५  (३) २,०००  (४) ४,८३५

(५) ३,७४९  (६) २७,८५९  (७) ६७,७७७  (८) ५६,७०८  (९) ३०,०५०

घडीपट्टीच्या साहाय्याने संख्येचे विस्तारित रूप




**लक्षात घ्या :** तीन, चार किंवा पाच अंकी संख्येचे वाचन करताना प्रथम सर्वांत जास्त स्थानिक किंमत असलेल्या अंकाचे वाचन व नंतर क्रमाने कमी स्थानिक किंमत असलेल्या अंकांचे वाचन करतात.

टेस्ट सोडवा

## 2. Number Work

Write the following numbers as instructed.

2. Write the numbers from their expanded form.

(1) 3,000 + 200 + 50 + 7 = 3257 (2) 10,000 + 5,000 + 1 = ☐

(3) 4000 + 500 + 10 + 3 = ☐ (4) 20,000 + 300 + 40 + 5 = ☐

(5) 7,000 + 80 + 3 = ☐ (6) 90,000 + 90 + 2 = ☐

3. Some digits and their places in the number are given below. Write down the numbers they make.

For example, 5 TTh, 2Th, 3H, 2T, 1U = 52,321 ; 9H, 8TTh, 5U = 80905

(1) 7 U, 2 T, 5 TTh, 9 Th (2) 3 H, 4 Th, 5 T, 1 TTh

(3) 5 T, 8 Th, 7 TTh (4) 5 Th, 7 TTh, 3 H, 2 T, 4 U

### Place value

**Tai** : Let's play a game. I'll say a number. You give the expanded form of that number. The number is : 55,555.

**Dhruv** : 50,000 + 5000 + 500 + 50 + 5

**Priyanka** : That's funny ! There's 5 in every place in the number. But its value is different in each place.

**Tai** : The place of a digit determines the value of the digit. Tell me the place value of each of the digits in the number 37842.

**Dhruv** : Let me tell. 3TTh is 3 ten thousands which is 30,000, 7 Th is 7000, 8H is 800, 4T is 40, 2U is 2.


**Exercise**

Write the place value of the underlined digit in the following numbers.

(1) 1,999 (2) 2,345 (3) 2,000 (4) 4,835

(5) 3,749 (6) 27,859 (7) 67,777 (8) 56,708 (9) 30,050

### The expanded form of a number on a folding strip




✍ **Remember :** When reading a number, the digits are read in the descending order of their place value. So we start with the digit of the greatest place value.

टेस्ट सोडवा

## Listen and sing.          revision

**Raindrops**

**1. Listen, repeat. Read aloud and sing.**
कविता ऐका, म्हणा. मोठ्याने वाचा आणि चालीवर म्हणा.

Oh, where do you come from,
You little drops of rain,
Pitter-patter, pitter-patter,
Down the windowpane?

Tell me, little raindrops,
Is that the way you play?
Pitter-patter, pitter-patter,
All the rainy day?

I sit here at the window;
I've nothing else to do;
Oh, I wish that I could play,
This rainy day, with you!

The little raindrops cannot speak,
But 'pitter-patter-pat'
Means 'we can play on this side,
Why can't you play on that?'

ओऽ 'वेअर् डु यु 'कम् फ्रॉम्
यु 'लिट्ल् 'ड्रॉप्स् अव्ह् 'रेऽन्
'पिटर् पॅटर् 'पिटर पॅटर्
'डाउन् द 'विन्डोऽपेऽन्

'टेल् मि लिट्ल् 'रेऽनड्रॉप्स्
इझ् 'दॅट् द 'वेऽ यु 'प्लेऽ
'पिटर् पॅटर् 'पिटर् पॅटर,
'ऑऽल् द 'रेऽनि 'डेऽ

आय् 'सिट् हिअर अट् द 'विन्डोऽ
आयव्ह् 'नथिंग् 'एल्स् टु 'डू
ओ आय् 'विश् दॅट् 'आय् कुड् 'प्लेऽ
दिस् 'रेऽनि 'डेऽ विथ् 'यू

द लिट्ल् 'रेऽनड्रॉप्स् कॅनट् 'स्पीक्
बट् 'पिटर् 'पॅटर् 'पॅट्
मीन्झ् 'वी कन् 'प्लेऽ ऑन् दिस् 'साइड्
वाय् कान्ट् 'यु 'प्लेऽ ऑन् 'दॅट्



**2. Read aloud the following sound words.**

* pitter-patter   * tring-tring   * zoom-zoom   * bow-wow
* ding-dong   * beep-beep-beep   * waa-waa-waa

* **What other words come to your mind on reading each word ? Write them down.**

**Example :** pitter-patter – rain, raindrops, water, small, fall, cool, etc.

पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

## ३. साठवण पाण्याची

### करून पहा

१. अंगणात दगड व मातीची छोटी टेकडी तयार करा. या टेकडीवर झारीने पाणी ओता. जणूकाही या टेकडीवर पाऊस पडत आहे. पाणी टेकडीवरून कसे वाहते, त्याचे खालील मुद्द्यांच्या आधारे निरीक्षण करा.

- पाणी कोठून कोठे वाहते ?
- जास्त उतारावर पाणी कसे वाहते ?
- कमी उतारावर पाणी कसे वाहते ?
- दगडांमुळे अडथळा येतो तेथे काय होते ?
- कोणत्या भागात तळी तयार होतात ?
- पाणी वाहण्याची दिशा कधी बदलते ?



२. आता टेकडीवर पाणी ओतायचे थांबवा. खालील मुद्द्यांच्या आधारे पुन्हा निरीक्षण करा.

- पाणी ओतायचे थांबवल्यावर टेकडी चटकन का वाळली ?
- ओली टेकडी वाळायला किती वेळ लागला ?
- टेकडीचा कोणता भाग लवकर वाळला ?
- कोणत्या भागाला वाळायला वेळ लागला ?
- वाळायला वेळ लागण्यामागचे कारण काय ?

तुमच्या असे लक्षात येईल, की पावसापासून मिळणारे काही पाणी जमिनीवरून वाहून जाते. काही पाणी जमिनीमध्ये मुरते. आपल्याला मिळणारे सर्व पाणी **पावसापासून** मिळते. पावसाळा तीन ते चार महिने असतो. आपल्यासह सर्व सजीव वर्षभर हे पाणी वापरतात.

पाणी साठवून ठेवले नाही तर आपल्याला पुरेसे पाणी मिळणार नाही, म्हणून पाणी साठवावे लागते. पाण्याचा वापर काटकसरीने करावा लागतो. पाणी साठवण्याच्या नावीन्यपूर्ण पद्धती आपण पाहू.

### जुने जलसाठे

आपल्या राज्यात जुन्या काळात पाणी साठवण्याच्या अनेक पद्धती होत्या. आता त्यांचा फारसा वापर होत नाही. मात्र त्यांचे अवशेष सर्व भागांत पाहायला मिळतात. त्यांतील काही खूप सुंदर आहेत. काही जलसाठ्यांचे पाणी कधीच आटत नाही.



### (१) विहीर

पावसाचे काही पाणी जमिनीत मुरते. ते मिळवण्यासाठी विहीर खणली जाते.

## ३. मराठा सरदार – भोसल्यांचे कर्तबगार घराणे

टेस्ट सोडवा

**वाचा व समजून घ्या.** सराव

परतले. हे कोणी केले ? कोण होते हे शिवभक्त ? ते होते मालोजीराजे भोसले.

**वेरूळचे भोसले :** वेरूळ गावचे पाटील मालोजीराजे भोसले हे थोर शिवभक्त होते. विठोजीराजे त्यांचे धाकटे भाऊ. वेरूळच्या बाबाजीराजे भोसल्यांची ही मुले. वेरूळ गावची पाटिलकी बाबाजीराजे भोसल्यांकडे होती.

मालोजीराजे व विठोजीराजे मोठे कर्तबगार होते, तसेच ते शूर होते. त्यांच्या पदरी पुष्कळ हत्यारबंद मराठे होते. तो काळ फार धामधुमीचा होता. निजामशाहीवर उत्तरेच्या मुघल बादशाहाने स्वारी केली होती. त्या वेळी दौलताबाद ही निजामशाहाची राजधानी होती. तेथे मलिक अंबर नावाचा त्याचा वजीर होता. तो मोठा कर्तबगार व हुशार होता. त्याने दौलताबादजवळील वेरूळच्या भोसले बंधूंची कर्तबगारी पाहिली. त्याने निजामशाहाजवळ त्यांच्या कर्तबगारीची वाखाणणी केली. निजामशाहाने मालोजीराजांना पुणे व सुपे परगण्यांची जहागीर दिली.

भोसल्यांच्या घरी वैभव आले. उमाबाई ही मालोजीराजांची पत्नी. ती फलटणच्या निंबाळकर घराण्यातील होती. या उभयतांना दोन मुलगे होते. एकाचे नाव शहाजी आणि दुसऱ्याचे नाव शरीफजी. शहाजी पाच वर्षांचा असताना मालोजीराजे इंदापूरच्या लढाईत मारले गेले. विठोजीराजांनी आपल्या पुतण्यांचा आणि जहागिरीचा सांभाळ केला. पुढे त्यांनी शहाजीसाठी लखुजीराव जाधवांच्या मुलीला मागणी घातली. जाधवांची लेक जिजाबाई मोठी सुलक्षणी होती. जिजाबाईसाठी विठोजीराजांनी घातलेली मागणी लखुजीरावांनी स्वीकारली. लखुजीराव म्हणजे निजामशाहीतील एक शूर व पराक्रमी सरदार होते. ते मोठा फौजफाटा बाळगून होते. निजामशाहाच्या दरबारातही त्यांची मोठी प्रतिष्ठा होती. त्यांनी शहाजीराजे आणि जिजाबाई यांचा विवाह मोठ्या थाटात साजरा केला. जिजाबाई भोसले कुळाची लक्ष्मी झाली.

**शहाजीराजे :** निजामशाहाने मालोजीराजांची जहागीर शहाजीराजांना दिली. शहाजीराजे पराक्रमी होते. निजामशाही दरबारात त्यांना मोठा मान होता. मुघल बादशाहाने ती निजामशाही जिंकायचा बेत केला. विजापूरचा आदिलशाहाही त्याला मिळाला, तेव्हा निजामशाही वाचवण्यासाठी मलिक अंबर व शहाजीराजे निकराने लढले. दोन्ही फौजांचा त्यांनी पराभव केला. अहमदनगरजवळ भातवडी येथे ही प्रसिद्ध लढाई झाली. या लढाईत शरीफजी मारले गेले, पण शहाजीराजांनी मोठा पराक्रम गाजवला. त्यामुळे शूर सेनानी म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक झाला. दरबारात त्यांची प्रतिष्ठा वाढली. इतकी की खुद्द मलिक अंबरला त्यांच्याबद्दल असूया वाटू लागली. त्यातून उभयतांत वितुष्ट निर्माण होऊन शहाजीराजांनी निजामशाही सोडली आणि ते विजापूरच्या आदिलशाहीला जाऊन मिळाले. आदिलशाहाने त्यांना 'सरलष्कर' हा किताब देऊन त्यांचा सन्मान केला. पुढे निजामशाहीत बऱ्याच घडामोडी झाल्या. वजीर मलिक अंबर मृत्यू पावला. त्याचा पुत्र फत्तेखान हा मोठा कारस्थानी होता. तो आता निजामशाहीचा वजीर झाला. त्याच्या काळात निजामशाहीला उतरती कळा लागली. मुघलांच्या स्वारीचा धोका निर्माण झाला. त्यातून निजामशाही सावरण्यासाठी निजामशाहाच्या आईने शहाजीराजांकडे परत येण्यासाठी साकडे घातले, तेव्हा शहाजीराजे आदिलशाही सोडून निजामशाहीत परत आले.

# माझा ऑनलाईन अभ्यास

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here

निर्मिती - श्री.प्रविण डाकरे, श्री.जयदिप डाकरे
वेब स्रोत-'ई-बालभारती'
सौजन्य- जिल्हा परिषद कोल्हापूर
https://www.gurumauli.in